जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

10 JAN 2017

महाराष्ट्र टाईम्स

# विद्यापीठाच्या सुरक्षा ताफ्यात 'ग्रीन कार'

▶▶ कोल्हापूर टाइम्स टीम

शिवाजी विद्यापीठाच्या सुरक्षा विभागाच्या वाहन ताफ्यात पर्यावरणपूरक ग्रीन कार दाखल झाली. विद्यापीठात दर महिन्याच्या पहिल्या शनिवारी राबवण्यात येत असलेल्या 'नो व्हेइकल डे' चे औचित्य साधून कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी सुरक्षा विभागास ही ग्रीन कार देण्यात आली.

विद्यापीठाच्या ८५० एकर परिसरात सुरक्षा विभागाकडून दिवसरात्र पेट्रोलिंग केले जाते. त्यासाठी पूर्वी एकच वाहन होते. त्यामुळे इंधनावरील खर्च मोठा होता. अलीकडेच या ताफ्यात मोटारसायकल दाखल झाली. त्यामुळे हा खर्च कमी झाला असून त्यात आणखी पर्यावरणपूरक वाहन दाखल झाल्यामुळे हा खर्च आणखी कमी होणार आहे.

ग्रीन कारची आसन क्षमता आठ आहे. पाच बॅटरीवर ही कार चालते. सहा तासांत या बॅटरी पूर्ण चार्ज झाल्यासनंतर सुमारे साठ किलोमीटरचे अंतर पार करतातत. यासाठी प्रतिदिन केवळ ५० रुपये खर्च येणार आहे. कार्यक्रमावेळी कुलगुरू डॉ. शिंदे यांनी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, सुरक्षा अधिकारी वसंत एकले यांच्यासह काही विद्यार्थिनींनी ग्रीन कारमधून कँपसमध्ये फेरफटका मारला.



विद्यापीठाच्या सुरक्षा विभागात ग्रीन कार दाखल झाली. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी फेरफटका मारला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

10 JAN 2017

लोकमत

# विद्यापीठ कायद्याचे स्वरूप इतरांना सांगा

## देवानंद शिंदे : शिवाजी विद्यापीठात 'सुप्टा'ची कार्यशाळा

**कोल्हापूर :** नव्याने अस्तित्वात आलेल्या विद्यापीठ कायद्याचा अभ्यास विद्यापीठाच्या सर्व घटकांनी करावा. हा कायदा समजून घेऊन त्याचे स्वरूप इतरांना देखील सांगा, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी शुक्रवारी येथे केले.

येथील शिवाजी विद्यापीठ पदव्युत्तर शिक्षक संघटनेतर्फे (सुप्टा) आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा व त्याचे स्वरूप यावर राज्यात प्रथमच 'सुप्टा'तर्फे ही कार्यशाळा घेण्यात आली. यावेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील माजी प्राचार्य डॉ. ए. पी. कुलकर्णी, प्रा. सुधाकर मानकर, ॲड. संतोष शहा, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील प्रमुख उपस्थित होते.

### विविध बाजूंवर प्रकाश

कार्यशाळेत प्रा. मानकर, ॲड. शहा आणि डॉ. पाटील यांनी विद्यापीठ कायद्यातील विविध बाजूंवर प्रकाश टाकला. ॲड. शहा यांनी कायद्याचा सरनामा, तसेच तक्रार निवारण पद्धतीच्या बदलावर भाष्य केले. नवा कायदा अनेक अर्थाने सुधारणा दर्शवितो, असे मत त्यांनी व्यक्त केले. प्रा. मानकर व डॉ. पाटील यांनी नव्या कायद्याच्या रचनेत लोकशाही व्यवस्था अधिक बळकट होण्याची आवश्यकता होती, असे मत व्यक्त केले.

कुलगुरु डॉ. शिंदे म्हणाले, विद्यापीठाच्या कायद्याची अंमलबजावणी करण्यामध्ये शिवाजी विद्यापीठ अग्रेसर असणार आहे. विद्यापीठातील सर्व घटकांनी हा कायदा संपूर्ण वाचून, अभ्यास करून त्याचे स्वरूप इतरांनाही सांगावे.

यावेळी डॉ. कुलकर्णी यांनी विद्यापीठाची नव्या कायद्यात अधिसभेची रचना, तसेच व्यवस्थापन परिषद आणि विद्यार्थी परिषद याची माहिती दिली. यावेळी 'सुप्टा' संघटनेचे अध्यक्ष डॉ. व्ही. बी. ककडे यांनी प्रास्तविक केले. डॉ. भानारकर यांनी सूत्रसंचालन केले. एस. टी. कोंबडे यांनी आभार मानले. (प्रतिनिधी)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

10 JAN 2017

सकाळ

# आप्पासाहेब पवार यांचा विद्यापीठात स्मृतिदिन

कोल्हापूर, ता. ९ : शिवाजी विद्यापीठातील 'कमवा आणि शिका' प्रबोधिनीतर्फे डॉ. आप्पासाहेब पवार यांचा ३५ वा स्मृतिदिन साजरा झाला. बीसीयूडी संचालक प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रबोधिनीचे उपाध्यक्ष डॉ. बी. एल. पाटील अध्यक्षस्थानी होते.

या वेळी प्रबोधिनीचे संचालक डॉ. सी. टी. पवार यांनी अठरा हजार रुपयांची देणगी जाहीर केली.

डॉ. मोरे म्हणाले, ''महाराष्ट्रातील शिक्षणाची तळागाळापासून बांधणी करण्याचा, उत्तम उच्चशिक्षित नागरिक घडविण्याचा ध्यास डॉ. पवार यांनी घेतला होता. या ध्यासापोटी त्यांनी सलग १२ वर्षे विद्यापीठाचे नेतृत्व केले.''

डॉ. पाटील म्हणाले, ''डॉ. पवार यांनी केवळ उच्चशिक्षित नागरिक घडविण्यासाठी काम केले नसून उच्च दर्जाचा, विचारांचा माणूस घडला पाहिजे, हे त्यांचे ध्येय होते.'' या वेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, उपप्राचार्य प्रा. टी. के. सरगर, कर्मचारी श्री. तोरस्कर यांचा सत्कार झाला. कार्याध्यक्ष डॉ. एस. जे. नाईक, डॉ. मानसिंग जगताप, किसन कुराडे, प्रा. एम. टी. हजारे, प्रा. खामकर, प्रा. एन. डी. गुरव, विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. आर. एम. गुरव, के. वाय. चव्हाण, डॉ. पी. व्ही. अनभुले, अशोक साबळे आदी उपस्थित होते.



कोल्हापूर : डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या स्मृतिदिन कार्यक्रमात बोलताना प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे. शेजारी (बसलेले) प्राचार्य डॉ. मानसिंग जगताप, डॉ. बी. एल. पाटील, प्राचार्य डॉ. एस. जे. नाईक, उपप्राचार्य डॉ. टी. के. सरगर, प्रा. किसन कुराडे.

10 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Times of India

# SUK invites PM Modi for convocation

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Shivaji University, Kolhapur (SUK) has officially invited Prime Minister Narendra Modi for its 53rd convocation ceremony which is likely to be held in February.

Director, BCUD, D R More said, "An official communication has been made with the Prime Minister Office (PMO) a few weeks back and we will be sending a detailed schedule of the ceremony to them."

More said, "Over the last communication, we we been told from the PMO that the suitable schedule can be arranged only after February 15. However, an official confirmation from the PMs office is still awaited. We are still hopeful that PM will grace the function with his presence."

A SUK official said, "The ceremony preparation has already begun at SUK and the total number of student awardees of the degrees is yet to be finalised. For the annual convocation day this year, over 20,000 applicants have applied through online payment gateway system."

The university has conferred over 50,000 degree certificates in the 52nd convocation ceremony last year. The number of degrees conferred then was the highest till date at SUK.

It has to be noted that the SUK started functioning in 1962 with 34 affiliated colleges and about 14,000 students with five Post-graduate Departments on the campus. Today, the total number of affiliated colleges has gone up to 282 and student strength up to three lakh with 40 Postgraduate Departments on campus.

During the last year function, the Institute of chemical technology (ICT) vice-chancellor and Padmashri awardee G D Yadav was the chief guest for the event.



UNIVERSITY ROUND-UP

# AISHE workshops in Sangli, Satara

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) will be conducting workshops for nodal officers on January 18 and January 20 at various colleges affiliated to the university. The workshops will focus on the initiative of All India Survey on Higher Education (AISHE) in Satara and Sangli respectively.

A circular, released by the SUK on Janaury 5, stated that the workshop in Sangli will be conducted at Mathubai Garware Kanya Mahavidyalaya on January 18. Another workshop will be conducted at Lal Bahadur Shastri College of Arts, Commerce and Science in Satara on January 20.

The circular added, "Attendance for nodal officers is mandatory and colleges affiliated to SUK must ensure that their representatives remain present."

An official of the university said that AISHE is an initiative by the Union ministry of human resource development which plays an important rold in the policy making.

"The university has been regularly sending the academic data within the stipulated deadline for the respective academic year," said the official.

AISHE covers information on enrollment of educational institutes at various levels. There is no restriction on a specific course and almost all the courses, including arts, science, agriculture, teacher education, management, engineering, polytechnics, medicine and nursing.

Another official of the university said that apart from AISHE, the nodal officers attending the event will be apprised of the Management Information System (MIS).

The MIS covers information from all the institutions in the state pertaining to higher education in the arts, science and commerce streams, besides law and non-engineering courses.

# NAAC norms: Varsity to issue notices

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** A total of 120 colleges — 119 unaided and one aided — affiliated to Shivaji University, Kolhapur (SUK) will be sent notices for not complying with National Assessment and Accreditation Council (NAAC) guidelines.

There are 282 affiliated colleges, including 135 aided and the remaining unaided. Of the 135 aided colleges, 134 have complied with the NAAC rule. However, only 28 of the unaided colleges have followed the norms.

"The situation of NAAC assessments at various colleges in the state university is bad. In our division, a large number of colleges, where the figures are in single digit, which are yet to do re-accreditation," D R More, director, Board of Colleges and University Development (BCUD) of SUK said on Monday.

"We have advised such colleges to complete the NAAC formalities or a notice of derecognition will be sent to them," he warned.

Affiliated colleges are supposed to go through the NAAC assessment process on an annual basis, but many of them do not follow the directives.

An SUK official that around two years ago, an official letter was issued by the directorate of higher education, in which colleges were instructed to follow the NAAC assessment directives or face a derecognition.

"Despite instructions, it has been observed that the unaided colleges are not following the norms. The NAAC assessment ensures that colleges follow certain standards for quality education. Grading is essential because it is accepted shows the standards of an institution and acknowledged worldwide," said the official.

"Currently, every educational institution, including the university and it colleges, needs to evaluate itself through NAAC's five yearly reaccreditation procedure to keep itself updated in terms of academic and administrative performance," the official added.

10 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत

**आंतरविद्यापीठ युवा महोत्सव : देशभरातील सुमारे दीड हजार विद्यार्थी कलाकारांचा सहभाग**

# शिवाजी विद्यापीठात फेब्रुवारीमध्ये रंगणार 'शिवोत्सव'

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात तरुणाईच्या विविध कलागुणांचे दर्शन घडविणारा 'शिवोत्सव-२०१७' हा युवा महोत्सव दि. १० ते १४ फेब्रुवारी दरम्यान रंगणार आहे. असोसिएशन ऑफ इंडियन युनिर्व्हसिटीज् (एआययु) आणि केंद्र सरकारच्या क्रीडा व युवा मंत्रालयाच्या सहकार्याने आठ वर्षांनंतर विद्यापीठामध्ये हा महोत्सव होणार आहे. त्यात देशभरातील १२५ विद्यापीठांमधील सुमारे दीड हजार विद्यार्थी-विद्यार्थिनी कलाकार सहभागी होणार आहे.

## विविध २६ समित्यांद्वारे महोत्सवाची तयारी सुरु



शिवाजी विद्यापीठाने केलेल्या मागणीनुसार 'एआययू'ने यावर्षीच्या महोत्सवाचे यजमानपद विद्यापीठाला दिले असल्याचे विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी सोमवारी दिली. ते म्हणाले, यंदाच्या युवा महोत्सवाला विद्यापीठाने 'शिवोत्सव' असे नाव दिले आहे. आठ वर्षांनंतर विद्यापीठाला या महोत्सवाचे संयोजन करण्याची संधी मिळाली आहे. त्याची तयारी गेल्या महिन्यापासून सुरु आहे. यासाठी निवास-जेवण, परीक्षक नियुक्ती, आदी स्वरुपातील विविध २६ समित्यांची नियुक्ती केली आहे. महोत्सवासाठी विद्यापीठात व्यासपीठांची उभारणी, आवश्यक साहित्यांची खरेदी, निमंत्रण पत्रिकांची छपाई, आदी स्वरुपातील तयारी सुरु आहे.

विविध कलाप्रकारांद्वारे भारतीय संस्कृतीचे संवर्धन व्हावे. महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या कलागुणांना राष्ट्रीय पातळीवरील व्यासपीठ उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने एआययू आणि केंद्र सरकारच्या क्रीडा व युवा मंत्रालयातर्फे दरवर्षी राष्ट्रीय आंतरविद्यापीठीय युवा महोत्सव घेण्यात येतो. गेल्यावर्षी म्हैसूरमध्ये महोत्सव झाला होता. यंदाचा ३२वा महोत्सव शिवाजी विद्यापीठात होणार आहे. त्यात संगीत, गायन, फाईन आर्टस्, नृत्य, प्रश्नमंजुषा, वक्तृत्व, लघुनाटिका, मूकनाट्य, एकांकिका, अशा विविध २५ कलाप्रकारांमध्ये महोत्सवात स्पर्धा होतील. देशातील पूर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर आणि मध्यवर्ती विभागातील महोत्सवातील विविध कलाप्रकारांमधील पहिल्या तीन क्रमांकांच्या विजेत्या विद्यापीठांचे संघ 'शिवोत्सव'मध्ये सहभागी होतील. आतापर्यंत चार विभागांचे महोत्सव पूर्ण झाले असून, सध्या पाचव्या विभागाचा महोत्सव गुजरातमध्ये सुरु आहे.

'शिवोत्सव'मध्ये देशातील विविध विद्यापीठांमधील सुमारे दीड हजार विद्यार्थी-विद्यार्थिनी कलाकार सहभागी होतील. त्यांच्या कलागुणांच्या माध्यमातून भारतीय संस्कृतीचे कोल्हापूरकरांना दर्शन घडणार आहे. या महोत्सवातील विजेत्यांची निवड दक्षिण आशियाई आंतरविद्यापीठ युवा महोत्सवासाठी होणार आहे. (प्रतिनिधी)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

10 JAN 2017

पुढारी

# विद्यापीठ दैनंदिनी, दिनदर्शिकेचे प्रकाशन

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०१७ ची दैनंदिनी व दिनर्दिशका यांचे प्रकाशन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते झाले. विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सभागृहात कार्यक्रम झाला.जनसंपर्क अधिकारी आलोक जत्राटकर यांनी उपक्रमाबद्दल माहिती दिली. यावेळी बीसीयूडी संचालक डॉ.डी. आर. मोरे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा नियंत्रक महेश काकडे, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. ए. एम. गुरव, उपकुलसचिव विभा अंत्रेडी, डॉ. नीलेश बनसोडे, एस. सी. घाटगे, अनुष्का कदम, अभिजित रेडेकर, निवास माने, डॉ. विनोद शिंपले, डॉ. मानसिंगराज निंबाळकर, भूषण पाटील आदी उपस्थित होते.